RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 February 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 15 February, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : आठवा | फेब्रुवारी २०१६



अवगुण (संदेश) 5

श्वासांची पुंजी (सत्संग) 7

इच्छा (संदेश) 17

रोजनिशी (संदेश) 27

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



महाराज कृपालजींच्या जन्मदिवसाच्या संगतला हार्दिक शुभेच्छा

अवगुण

परमसंत कृपाल सिंहजी महाराजांनी संगतला दिलेला संदेश

आपला मृत्यू अटळ आहे ही बाब जर आपल्या लक्षात आली तर आपल्या जीवनात खूप काही बदल घडू शकतो. ध्यान–अभ्यास करताना आपण नेहमी सतर्क राहावयास हवे, अन्यथा आपले मन इतरांबद्दलच्या विचारांमध्ये आपणांस गुंतविते, त्यांच्या कामाची निंदा–अलोचना करू लागते.

इतरांचे सदगुण अवगत करण्याऐवजी आपण त्यांचे अवगुण अवगत करतो. आपण जर इतरांचे अवगुण पाहू लागलो तर, आपणांमध्ये देखील ते अवगुण उतरतील, कारण जसा आपण विचार करतो, तसे आपण बनतो.

परमात्मा सांगतो,''माझा सर्वोत्तम मुलगा तोच आहे ज्यास इतरांमध्ये मी नजरेस पडतो.'' विचार अतिशय प्रभावशाली असतात, त्यामुळे इतरांचे अवगुण पाहण्याऐवजी तुम्ही त्यांचे सदगुण पाहावयास हवेत. तुमचे बोल मधुर असावयास हवेत जेणेकरून इतरांच्या भावनेस ठेच लागू नये. इतरांच्या भावना दुखावणे हे अतिशय घोर पाप आहे. तुम्ही परमात्म्यावर प्रेम करू इच्छिता, तरीदेखील इतरांना कोसता ज्यांच्या अंतरात परमात्मा वसतो.

ज्या व्यक्तीस इतरांमधील कमतरता पाहण्याची सवय असते, अशा व्यक्तीशी संबंध ठेवण्याऐवजी तुम्ही त्यापासून दूर रहा. इतरांमध्ये अवगुण पाहण्याचा आणि त्यांमधील कमतरता शोधण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे? परमात्म्यास प्राप्त करणे सोपे आहे, परंतु स्वत:मध्ये सुधार घडविणे अतिशय अवघड आहे. जर का तुम्हाला हे समजले की प्रत्येकामध्ये परमात्मा वसतो, तर तुम्ही इतरांचे हृदय दुखवाल का? आपणांस एक–एक करीत आपल्यामधील अवगुण आणि कमतरता त्यागणे गरजेचे आहे. यासाठीच मी आपल्या आत्मनिरीक्षणासाठी डायरी (रोजनिशी) लिहिण्याचा आग्रह करतो.

इतरांचे हृदय दुखावण्याचा राक्षसी अवगुण जर एखादा मनुष्य त्यागत नसेल, तर आपण इतरांना मदत करण्याचा सद्गुण का सोडावा? आपणांस इतरांचे निरीक्षण करायचे असल्यास, त्यांच्या सद्गुणांचे निरीक्षण करा. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही कमतरता असतात व काही सद्गुणही असतात.

स्वामीजी महाराज सांगतात,''मी तुम्हांस सल्ला देतो की जर कमतरता पाहावयाच्या असतील तर स्वत:च्या अंतरात डोकावून पाहा व जर सद्गुण पाहावयाचे असल्यास ते इतरांचे पाहा.''

तुम्ही माझे सांगणे ऐका, सावधान व्हा! तसे न केल्यास तुम्ही पस्तावाल, परंतु तोपर्यंत खूप उशीर झालेला असेल. आता हे तुम्हावर अवलंबून आहे की तुम्ही यावर अंमल करावा की नाही! परमात्म्याने आपणांस जिव्हा त्याचे स्मरण करण्यासाठी दिलेली आहे, इतरांच्या भावना दुखावण्यासाठी नाही.

***

श्वासांची पुंजी

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू नानक देवजी व गुरू अंगद देवजी महाराजांची वाणी, संत बाणी आश्रम, राजस्थान – २७ डिसेंबर १९८८

सर्व संतांचा हाच उपदेश आहे की ज्याने या संसाराची रचना रचलेली आहे, त्यानेच हे नियम लागू केले आहेत की दिवस व रात्र कशारीतीने बनावेत व त्याने सूर्य, चंद्र व तारामंडळास आप–आपल्या जागी निर्माण केले. तसेच त्याने इतरही ग्रह निर्माण केले. कोण त्यास निसर्ग म्हणतो, महात्मा त्यास परमात्मा वा 'कुदरत' म्हणतात. गुरु नानक देवजी म्हणतात:

कुदरत दीसे कुदरत सुणिएं, कुदरत भाओ सुख सार।

आपण सांगता की आपण त्यास कोणत्याही नावाने संबोधीत करा, तो परमात्मा एकच आहे ज्याने ही रचना निर्माण केलेली आहे. त्याचे नियम पक्के आहेत व आपोआपच काम करीत आहेत. हा संसार व त्यातील पशू–पक्षी, मनुष्य इत्यादी निर्माण करून तो बेफिकीर होऊन बसलेला नाही. त्याने सर्वांस आपल्या नजरेखाली ठेवलेले आहे.

महात्मा आपणांस हे देखील सांगतात की चांगले व वाईट असे दोन्ही प्रकारचे जीव त्याने स्वत:च निर्माण केलेले आहेत व दोघांनाही तो आपल्या नियमांनुसार चालवत आहे. आपणांस कोणाचीही टीका करण्याचा अधिकार नाही. जो दुष्कर्म करतो त्याच्या वाईट कर्मांचा हिशोब जमा होतो, त्याकर्मांची परतफेड करण्यासाठी परमात्मा त्या जीवास पुन्हा या संसारात पाठवितो.

आपले संतांच्या संगतीत येणे, गुरू लाभणे, नामदान मिळणे या सर्व गोष्टी अगोदरच सुनिष्चित केलेल्या असतात परंतु त्यांचे ज्ञान नसल्याकारणाने आपण जोपर्यंत बाह्यजगात बसलेलो आहोत तोपर्यंत त्रस्त रहातो. आपण मान्य करतो की महात्मांनी ज्यांना नामाशी जोडून त्यांची जबाबदारी घेतलेली आहे, त्यांना नाम आज ना उद्या नक्कीच स्वत:त सामावून घेईल. नामाच्या

कमाईवर जोर यासाठी दिला जातो की आपण जिवंतपणीच भ्रम व संशयाच्या जाळ्यातून बाहेर पडून सत्यास स्वत:च्या डोळ्यांनी पहावे.

महाराज कृपाल पैगंबर मूसाची कथा सांगत असत की मूसाने परमेश्वरास एकदा सांगितले की,''तुम्ही प्रत्येक जीवास रोज उपजीविकेसाठी अन्न-पाणी देता देता थकत असाल, प्रत्येकाचा सांभाळ करणे खूप अवघड असते, मी आपला थोडाफार हातभार का लावू नये? मला ही ड्यूटी द्या.'' परमेश्वराने म्हटले,''मूसा, ही ड्यूटी बजावणे फार कठीण आहे.''

अखेरीस परमेश्वराने मूसास आपला प्रिय पुत्र मानून म्हटले,''आज तू सर्वांना अन्न-पाणी पोहोचविण्याचे काम कर.'' त्याने सर्वांना अन्न-पाणी पोहोचविले परंतु एका व्यक्तीस दिले नाही. ज्यास अन्न मिळाले नाही तो परमेश्वरास नावे ठेवू लागला. जेव्हा परमेश्वराने मूसाला बोलावून विचारले तेव्हा तो म्हणाला,''हा अतिशय वाईट मनुष्य आहे, दुष्कर्मी आहे, याचे नाव घेणे सुद्धा पाप आहे. हा तो व्यक्ती आहे ज्याने एका मृत बाईस कबरीतून काढून तिच्यासोबत दुष्कर्म करीत होता. आता तुम्हीच सांगा, असा मनुष्य अन्न-पाणी देण्यायोग्य आहे का? उपजीविका मिळण्याचा हक्क त्यास आहे का?''परमेश्वर म्हणाला,''होय मूसा. जर त्याने दुष्कर्म केले तर ते स्वत:साठी केले, त्यामुळे अन्न-पाणी देणारा तर दुष्कर्माचा भागीदार बनत नव्हता ना?'' परमात्मा एक आहे, तो चांगल्या-वाईट सर्व व्यक्तींच्या अंतरात आहे.

गुरु नानक देवजी महाराज म्हणतात,''तुम्ही स्वत:च अनुभव घ्या, शब्दाशी एकरूप होऊन अंतर्यात जाऊन पहा, त्यानंतर जर तुम्ही कोणास वाईट म्हटले तर आम्ही तुमचे म्हणणे मानू. जेव्हा आपण आपल्या आत्म्यावरील तीनही पडदे बाजूस सारून अंतर्यात जातो, तेव्हा तेथे कोणी वाईट दिसतच नाही, तेथे कोणी परका नसून सर्वांमध्ये परमात्मा दिसतो.

हजरत ईसाने देखील म्हटले आहे की,''तुम्ही तुमच्या विरोधकांसाठी सुद्धा प्रार्थना करा.'' महान संत कबीर साहेब सांगतात:

अव्वल अल्लाह नूर उपाया कुदरत के सब बंदे।
एक नूर ते सब जग उपजया कोण भले कोण मंदे।।

जी लोकं असे म्हणतात की आम्ही खूप नामाची कमाई केलेले ध्यानी आहोत तीच लोकं दुसऱ्या बाजूने इतरांची निंदा करण्यात गुंतलेले असतात. अशा लोकांना संत उत्तर गप्प राहूनच देतात.

महाराज सावन सिंहजींची खूप निंदा–आलोचना केली गेली. एका पंथाने तर आपल्या विरुद्ध पुस्तक देखील छापले. याचप्रमाणे महाराज कृपाल तसेच इतर अनेक संतांच्या बाबतीत देखील असे बरेचसे प्रसंग घडले आहेत की संसारिक लोकांनी त्यांच्याशी किती दुर्व्यवहार केला. अत्यंत खेदाने सांगावे लागते की, संतमतातील अनुयायींनीच महात्मांची निंदा केली, त्यांच्याशी वाईट वर्तणूक केली. जेव्हा महाराज सावन सिंहजींना सांगितले गेले की आपण यांना काहीतरी उत्तर द्या तेव्हा ते म्हणाले,''संतांचे गप्प रहाणेच या लोकांना दिलेले उत्तर असते.''

प्रियजनहो, संतांच्या अंतरात खूप नम्रता व विश्वास असतो. महाराज कृपालजींना देखील सांगितले गेले होते की तुम्ही या पुस्तकाचे उत्तर द्या तेव्हा ते हसून म्हणाले, ''या! आपण सर्व प्रभू परमात्माचे नामस्मरण करण्या करीता येथे एकत्रित झालो आहोत, आपण सर्व मिळून परमात्म्याच्या स्मरणात बसू.'' आपण सत्यापासून दूरावलेले असतो म्हणूनच संतांना असे म्हणतो.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''खोटा व नीच मनुष्य आपण कसे बरोबर आहोत हे सिद्ध करण्यासाठी स्पष्टीकरण देतो परंतु समंजस मनुष्य योग्य वेळेची वाट पाहतो. तो म्हणतो वेळ आल्यावर त्याला आपोआपच उलघडा होईल कारण निंदा करतेवेळी मनुष्य एखाद्या खास दुष्कर्माच्या प्रभावाखाली असतो, त्यास स्वत:ची शुद्ध नसते.''

मी असे लोकही पाहिले आहेत ज्यांनी महाराज सावन सिंहजींच्या विरोधात चर्चा करण्यासाठी एक सभा बोलवली होती. ते सरळ गोष्टींचा

विरुद्ध अर्थ काढून सांगत असत. योग्य वेळ आल्यानंतर त्यातील अनेक जण माझ्याकडून नामदान देखील घेऊन गेले. आता त्यांचे कुटुंबिय देखील सत्संगी आहेत. परंतु आज त्यांच्याकडे पश्चाताप करण्याखेरीज दुसरे काहीच नाही. ते मान्य करतात की आम्ही खूप वाईट काम केले.

प्रियजनहो, आपल्यापुढे गुरू अंगद देवजी व गुरू नानक देवजी महाराजांची छोटीशी वाणी सादर केली जात आहे. आपण सांगता की परमात्मा स्वतःच उपाय काढतो, स्वतःच जीवांना आपल्या नजरेखाली ठेवतो तर मग कोणास वाईट म्हणावे, सर्वच चांगले आहेत, सर्वांचा मालक परमात्मा एकच आहे.

आप उपाया नानका आपे रखै वेक।
मंदा किसनूं आखिए जां सबना साहिब एक।
सबना साहिब एक है वेखै धंधे लाई।
किसे थोड़ा किसे अगला खाली कोई नाहीं।।

आपण सांगता,''जसे वडील आपल्या मुलांना काही रक्कम भांडवल म्हणून देऊन सांगतात की या भांडवलाचा योग्य व्यापार करा. समजुतदार मुले व्यापार करून त्या रक्कमेत वृद्धी करतात. ते पाहून त्यांचे वडील प्रसन्न होतात. परंतु काही मुले अशी असतात जी मूळ भांडवल देखील गमावून बसतात. तेव्हा त्यांचे संसारिक वडील देखील त्यांस झिडकारतात.

त्याचप्रमाणे परमात्मा सर्वांना श्वासांची पुंजी देऊन या संसारात नामाची कमाई करण्यासाठी पाठवितो. तो कोणास कमी तर कोणास जास्त **श्वासांची पुंजी** देऊन संसारात धाडतो, परंतु तो सर्वांस पुंजी जरूर देतो. तो पहात असतो की हे काय करीत आहेत. त्यातील काही या संसारात येऊन चांगला व्यापार करतात. धंधा सर्वच करतात परंतु जे परमात्म्याच्या सांगण्यानुसार आपले जीवन जगतात व प्रभूच्या भक्तीसाठी वेळ देतात तेच शाबासकी मिळविण्यास पात्र ठरतात.

आवे नंगे जाहे नंगे विचे करहि विचार।
नानक हुक्म न जाणिंए अग्गे काई कार।।

गुरू नानक देवजी महाराज अतिशय आश्चर्यजनक गोष्ट सांगतात की जीव संसारात येताना नग्न असतात व परत जाताना सुद्धा नग्नच असतात, मुठ बंद करून जन्म घेतात व हाताची मूठ मोकळी सोडून परत जातात. आपण इथे पहातो की सर्व माया गोळा करण्याच्या शर्यतीत गुंतलेले आहेत, काही भरपूर तर काही थोडी माया गोळा करतात. परंतु संसारातून परत जाताना रिकाम्या हाती जातात.

जेव्हा नामाची कमाई केली नाही, शब्दाशी एकरूप झालो नाही, आपल्या आत्म्यास मनाच्या पंजातून स्वतंत्र करून अंतर्यात परमात्म्याशी मेळ केला नाही तर मग पुढे त्याची मर्जी असते की त्याने आपणांस काय द्यावे? खूप कष्ट द्यावे का आजारपण द्यावे. आपणांस कोणता जन्म द्यावा व त्याजन्मात आपणांस कोणकोणते कष्ट भोगावे लागावेत ही त्याची मर्जी असते.

आपण पहातो की मोठमोठ्या शक्तीशाली देशांचे राष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि डिक्टेटर देखील संसार सोडून निघून जातात. असे कधीही पाहिले नाही की ते आपल्या सोबत त्यांचे सर्व सैन्य किंवा संपूर्ण देशच घेऊन गेले. ही आश्चर्यजनक गोष्ट आहे की असे जीव देखील नग्न जन्मास येतात व हात मोकळे करून नग्नच या संसारातून निघून जातात. इतके सर्व पाहूनही आपल्यावर त्याचा काहीच परीणाम होत नाही. आपण विचार करतो की मृत्यु तर इतरांसाठी आहे, आमच्यासाठी तर ऐशो–आराम तसेच संसारिक धन–पदार्थ गोळा करणेच लिहीलेले आहे. कदाचित त्यांनी आळस केला म्हणून ते या संसारिक गोष्टी सोबत घेऊन जाऊ शकले नाहीत, परंतु आपण त्या सोबत घेऊन जाऊ. हा आपला गैरसमज आहे. कबीर साहेब सांगतात:

एह तन कागज की पुड़िया बूँद पड़त गल जाओगे।
कहत कबीर सुनों भई साधो ईक नाम बिना पछताओगे।।

हे शरीर एखाद्या कागदी पुडीप्रमाणे आहे. कागदावर पाणी पडल्यास तो पाघळून जातो. आपल्या शरीराचीदेखील हीच परिस्थिती असते. एखादे आजारपण या शरीरास नष्ट करेल, एखादा रोग लागेल अथवा वार्धक्य येईल; आपणांस नाम मिळाले नाही तर पस्तावावे लागेल.

जिनस थापी जिआं कोऊ भेजे जिनस थापि ले जावे।
आपे थापि उथापे आपे ऐते वेस करावे।।

गुरू नानक देवजी महाराज सांगतात,''परमात्मा स्वत:च जीवांना श्वासांची पुंजी व बुद्धी देऊन संसारात पाठवितो व मुदत पूर्ण झाल्यावर तो स्वत:च त्यांना माघारी बोलावितो. असे होत नाही की जन्मास कोणी दुसरा घालतो व मृत्युसमयी कोण दुसराच घेऊन जातो. ही व्यवस्था परमात्म्याने स्वत:च्या हातातच ठेवलेली आहे.''

जेते जीव फिरे अधूति आपे भिखिया पावे।

आपण सांगता की आपणांस जे लहान मोठे जीव दृष्टीस पडतात ते सर्व भिकारी आहेत. परमात्मा सर्वांना त्यांच्या कर्मांना अनुसरून भिक्षा देतो परंतु असे म्हणणे फार कठीण आहे कारण आपण मन–बुद्धीच्या प्रभावाखाली आहोत. आपण म्हणतो की आम्ही समंजस आहोत, आम्ही अशा रीतीने काम केले तेव्हाच इतके धन कमावले, परंतु जीवनात आपण अनुभवतो की कधी कधी चांगल्या पारांगत्त व्यापाऱ्यांचे देखील दिवाळे निघते. तुम्हीच विचार करा, अगोदर त्यांची इतकी उन्नती व भरभराट होते व नंतर ते इतके चाणाक्ष व समंजस व्यापारी असूनही त्यांचे दिवाळे का वाजते? सर्व काही परमात्म्याच्या हुकूमानुसार घडत असते. जर एखादे चांगले काम केले तर त्याचे श्रेय आपण स्वत:ला देतो व जर काही नुकसान झाले किंवा वाईट घडले तर आपण त्यागोष्टीसाठी परमात्म्यास दोषी ठरवितो म्हणूनच आपण परमात्म्यापासून दूरावलो आहोत.

आपणांस माहित आहे की आजच्या आधुनिक युगात डॉक्टरांनी नविन औषधांचा शोध लावण्यात तसेच ऑपरेशन क्षेत्रात खूप कमालीची प्रगती केलेली आहे. आजकाल कृत्रिम हृदय लावले जाते, एकाचे अवयव दुसऱ्याला बसविले जातात व असे इतरही अनेक चमत्कार केले जातात जे ऐकून बुद्धी अचंबित होते की असा चमत्कार कसाकाय शक्य झाला? आजच्या आधुनिक युगात विज्ञानाने खूपच प्रगती केलेली आहे, लोकांची खूप चालाख बुद्धी आहे. परंतु इतके असूनही परमात्मा ज्यास या संसारातून घेऊन जाऊ इच्छितो, त्यापुढे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरतात. कबीर साहेब सांगतात:

वैद्य कहे हौं ही भला दारू मेरे वस। ऐह ते वस्त गोपाल की जब भावे ले खस।।

गुरू नानक देवजी महाराज आपल्या वाणीत सांगतात:

औखद आए रास जेह विच आप खलोया।

डॉक्टरचे औषध तेव्हाच गुणकारक ठरते, ऑपरेशन करतेवेळी त्याचे हात व डोळे तेव्हाच परिणामकारक ठरतात जेव्हा परमात्मा स्वत: उभा राहतो की मला या जीवाची मदत करावयाची आहे, यास अजून **श्वासांची पुंजी** द्यावयाची आहे आणि त्याचे श्रेय डॉक्टरला द्यावयाचे आहे.

लेखे बोलण लेखे चलण काउति कीचहि दावे।

गुरु नानक देवजी महाराज सांगतात,''आपण जमिनीवर जी पावले ठेवतो, चालतो–फिरतो, जे काही बोलतो, ते देखील परमात्मा ऐकतो. हे सर्व हिशोबात धरले जाते. परमात्मा रजिस्टर लिहीतो, आपण असे समजू नये की तो पहात नाही.'' ज्या महात्म्यांचे आंतरिक नेत्र उघडलेले असतात ते सांगतात की परमात्मा आपल्याला प्रत्येक ठिकाणी पहात आहे.

आपणांस माहीत आहे की आजच्या युगात मनुष्यांचा जीव परमाणू स्फोटक बॉंब तयार केलेल्या शक्तीशाली देशांच्या मुख्य व्यक्तींच्या हातात आहे. परंतु आपण हे देखील पहातो की अशा शक्तीशाली देशांमध्ये देखील



भीषण भूकंप, वादळे व इतर प्रकारची नैसर्गिक आपत्ती ओढावते, तर मग आपण कोणत्या गोष्टीचा गर्व करतो? अशी लोकं लष्करी शक्ती बनविता बनविता नष्ट होतात व दुसरी लोकं येऊन त्यावर अधिकार गाजवितात.

मूल मति परवाणा ऐहे नानक आखे सुणाए।

गुरू नानक देवजी महाराजांच्या समजावण्याचे मूल–मत (सारांश) तसेच आजपर्यंत जे महात्मा या संसारात आले आहेत त्या सर्वांचा उपदेश हाच आहे की शब्द–नामाची कमाई करा. आपणांस परमात्म्याने जी **श्वासांची पुंजी** दिलेली आहे ती प्रभू परमात्म्याच्या भक्तीत गुंतवून तिचा सदुपयोग करा. नम्रता महात्मांचा श्रृंगार असतो. ते या संसारात येऊन आपल्यापुढे आदर्श ठेवतात आणि आपणांस प्रेमाने समजावतात की, ''जर परमात्म्याने आपल्या कर्मांना अनुसरून आपणांस एखादी शक्ती, विद्या किंवा कला दिलेली असेल तर आपण देणाऱ्याचे आभार मानावे, त्यास विसरू नये.''

करणी ऊपर होय तपावस जे को कहे कहाए।।

गुरू नानक देवजी महाराज आपणांस सचेत करतात की जशी करणी (ध्यान अभ्यास) करून आपण अंतर्यात जाल, तेथे आपल्या समोर आपल्या कर्मांचा हिशोब वाचला जाईल की आपण संसारात काय काय केले. तेथे जीव स्वत:च्या डोळ्यांनी आपण केलेली कर्मं पहातो, त्यास नकारू शकत नाही. आपण केवळ कथन करून भक्त वा जपी–तपी बनू शकत नाही, नामकमाई करूनच भक्त वा तपी बनू शकतो. परमात्म्यास पाखंड आवडत नाही त्यास भक्ती व प्रामाणिकपणा प्रिय असतो. कबीर साहेब सांगतात:

पाखंडिया नर भोगे चौरासी खोज करो मन माही रे।

प्रभू परमात्म्यास भक्ती प्रिय आहे तेव्हा तुम्ही भक्ती करा. कथन करून आपण जगास धोका देऊ शकतो व स्वत:सही धोका देत आहोत. आपल्याला वाटते की आपल्याला कोण पहात आहे? जो आपल्या अंतरात

बसलेला आहे तो आपली प्रत्येक हालचाल पहात आहे. त्याच्या हिशोबात आपले खाणे–पीणे, उठणे–बसणे, चालणे–फिरणे सर्व काही धरले जाते.

गुरुमुख चलत रचायन गुण प्रगटी आया।

गुरुमुख संत–महात्मा परमात्म्याची प्रिय मुले बनलेली असतात, ते या संसारास एक तमाशा समजतात की कशा प्रकारे परमात्म्याच्या हुकूमानुसार जीव धावपळ करीत आहेत, आपआपल्या संसारिक कामात गुंतलेले आहेत.

गुरबाणी सद उचरे हरि मन वसया।

आता आपण सांगता, जे उठता–बसता शब्द–नामाची कमाई करतात परमात्मा त्यांच्या अंतरात निवास करतो.

शक्ति गई भ्रम कटया शिव जोत जगाया।

आपण सांगता, ''अंतरातून शक्ती मायेचा भ्रम निघून गेला आणि परमात्म्याची ज्योत प्रगट झाली.''

जिनके पोते पुन्न है गुर पुरख मिलाया।

आपण आपल्या अनुभवाचे वर्णन करतात की ज्यांची पूर्वजन्माची खूप चांगली कर्मं आणि पुण्य जमा होतात केवळ त्यांसच गुरूंची माहीती मिळते व केवळ तेच गुरुमुखांना भेटून त्यांच्याकडून नामदान प्राप्त करतात.

नानक सहजे मिल रहे हरि नाम समाया।

गुरू साहेबांनी या वाणीत नामाचा महिमा वर्णिलेला आहे की आमच्यावर गुरूंची दया झाली त्यामुळे आम्ही परमात्म्यास प्राप्त केले. ज्यांच्या खात्यात पुण्य असतात केवळ त्यांचीच गुरुमुख संतांशी भेट घडते, त्यांच्याच अंतरात नाम घेण्याची आणि नामाची कमाई करण्याची इच्छा निर्माण होते.

***

इच्छा

परमसंत कृपाल सिंहजी महाराजांद्वारे संगतसाठी एक महत्वपूर्ण संदेश,
संत बानी आश्रम, अमेरीका – १७ अक्टोबर १९७२

तन धर सुखिया कोई न देखया जो देखया सो दुखिया हो।

सतगुरू म्हणतात, ''आपण सुखी नसल्याचे काय कारण आहे?'' खरेतर आनंद निर्माण होण्याचे मूळ आपल्या अंतर्यात आहे, परंतु आपण आपले संपूर्ण आयुष्य सुग्रास अन्न खाण्यात, सुंदर वस्त्रे परिधान करण्यात, छान–छान वस्तु पाहण्यात व संगीत श्रवण करण्यातच आनंदाचा शोध घेत राहतो. तुम्ही जर बाह्य जगास दूर सारून शरीरामधील चैतन्याच्या वर उठला असता तर तुम्हास ज्योतीचे उगमस्थान नक्कीच प्राप्त झाले असते.

सतगुरु सांगतात की या सकल सृष्टीमध्ये मनुष्य जन्माचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. या जगातील सर्व आनंद व ज्ञान तुमच्या अंतर्यात आहे. इच्छांची पूर्ती करून घेण्यासाठी तुम्हाला मनुष्य जन्मात यावे लागेल. बाह्य प्रवृत्तींमुळेच आपले शरीर ओळखले जाते. या सर्वांमध्ये आपले लक्ष इतके एकरंग झाले आहे की आपण स्वत:स देखील विसरून गेलो आहोत. तुम्ही अंतर्यातून जागृत व्हा. हे शरीर किती दिवस चैतन्यमय राहिल? काही दिवस काही वर्षे? अखेरीस आपणांस या शरीराचा त्याग करावा लागणार आहे.

मनुष्यजन्म ही आपणासाठी आनंदाचे उगमस्थान शोधण्यासाठी मिळालेली सुवर्णसंधी आहे, जे स्थान आपल्या अंतर्यातच आहे. परंतु असे तेव्हाच घडू शकते, जेव्हा आपण आपल्या शारीरिक चेतनेच्या पातळीवरून वरच्या पातळीवर जाऊ. संत–सतगुरु या संसारात येऊन आपणांस हीच शिकवण देतात की शारीरिक चेतनेच्या पातळीवरून वर यावे आणि बाह्य जगातून आपले ध्यान दूर करावे. दोन्ही नेत्रांच्या मधोमध आत्म्याचे आसन आहे. मृत्यूसमयी जेव्हा आपला आत्मा शरीर त्यागतो, तेव्हा तो नेत्रांच्या पाठीमागे

आकसीत होतो आणि त्यानंतर जेव्हा आत्मा वरच्या दिशेने जाऊ लागतो तेव्हा तुम्ही पाहाल की तेथे जीवनरस वाहत आहे.

शरीराखालील स्थानावरून आपले लक्ष दूर करून वरील पातळीवर संक्रमण करावे. ज्योतीच्या दिशेने जाणारा हाच मार्ग आहे. हाच परमात्म्याकडे परतण्याचा मार्ग आहे. बाह्य जगामधील जीवन तुम्हांस अल्प कालावधी करीताच दिले गेलेले आहे, याचा तुम्ही पुरेपूर फायदा करून घ्यावा. अखेरीस हे शरीर तुम्हांस त्यागावे लागणार आहे.

शरीर त्यागण्याचा अर्थ मृत्यू आहे. मृत्यू होत असताना मनुष्याचे लक्ष बाह्य जगातून दूर सरते. त्याच्याजवळ दुसरा मनुष्य गेल्यास, मृत्यू पावणारा मनुष्य त्यास ओळखत नाही, कारण आत्मा त्यावेळी शरीरातून एकवटत असतो. त्यावेळी शरीर अचेत होते, नेत्र वरच्या बाजूस फिरतात आणि तो मनुष्य जगातून निघून जातो. यासच अध्यात्म म्हणतात.

अरे मनुष्य! या शरीराचा त्याग करण्याचे तंत्र शिकून घे. सरतेशेवटी तुला हे शरीर दिवसाअखेरीस त्यागावयाचे आहेच. असेही होऊ शकते की तुम्ही निद्रावस्थेत गेल्यानंतर पुन्हा जागृत होणारच नाही. निद्रेस मृत्यूची लहान बहीण असे संबोधले जाते.

आपण कुटुंब, आप्तेष्ट, मित्र आणि बाह्य आनंद–रसांशी बांधले गेलो आहोत. एकच काम जेव्हा आपण दररोज करतो, तेव्हा ती आपली सवय बनून जाते. ती सवय आपल्या स्वभावामध्ये परिवर्तीत होते. मग ती सवय आपण सोडू शकत नाही. आपणांस मृत्यूचा विसर पडतो. आपण विचार करतो की आपण तर या जगात मजा करण्यासाठी आलेलो आहोत. तुम्ही या गोष्टीपासून अनभिज्ञ राहिलात तर मग काय होईल? अखेरीस एकेदिवशी तुम्हांस येथून निघून जायचेच आहे.

या जगाचे बंधन वृद्धींगत का होत जाते कारण या बंधनात आपण फसत जातो. बाह्य जगासंदर्भात असलेल्या सर्व प्रकारच्या इच्छांचा त्याग करा.

भगवान बुद्ध सांगतात,''इच्छा रहित बना.'' दहावे गुरुसाहेब देखील हेच सांगतात, ''इच्छा रहित बना.'' इच्छा हीच अशी वस्तू आहे जी आपणांस रोज-रोज बाह्य जगाकडे खेचून नेते व त्यांमागे गेलात तर शेवटी जोरात आदळाल. या बाह्य वस्तूंच्या बंधनाचे कारण तुमच्या इच्छाच आहेत.

महान अकबराचा प्रधानमंत्री वली राम होता. अकबराच्या दरबारात अशी परंपरा होती की राजा दरबारात प्रवेश करताना सर्व मंत्री उभे राहात असत आणि जोपर्यंत राजा बसत नसे तोपर्यंत ते मंत्री जागचे हलूही शकत नसत. एके दिवशी वली रामच्या कोटात विंचू घुसला होता. परंतु राजा दरबारात प्रवेश करीत असल्याने त्याचा आदर-सन्मानार्थ तो हालचाल करू शकत नव्हता. विंचवाने एक-एक करत वली रामच्या शरीरास तीन-चार वेळा दंश केला.

जेव्हा राजा बसला, तेव्हा वली राम म्हणाला, ''हे पाहा! या विंचवाने मला अनेकदा दंश केला, परंतु राजाच्या आज्ञेचे पालन व्हावे म्हणून मी हालचाल केली नाही. राजाच्या आज्ञेचे पालन केल्यानेच मी प्रधानमंत्री बनलो आणि मला इतके उच्चपद मिळाले. मी जर परमात्म्याच्या आज्ञेचे पालन केले तर मी याहूनही मोठा बनू शकतो.'' असे म्हणत वली रामने आपला कोट काढून फेकून दिला व जंगलाच्या दिशेने पळत निघून गेला.

वली राम राजास खूप प्रिय होता. त्यास माघारी बोलावण्यासाठी राजाने एका मंत्र्यास पाठविले. वजीराने अनेक प्रकारे विनंत्या केल्या. वली राम त्या विनंत्या अव्हेरत म्हणाला, ''पूर्वी मी राजाची सेवा केली, परंतु आता मी परमात्म्याच्या सेवेमध्ये रत झालो आहे.'' नंतर राजा स्वत: वली रामकडे गेला आणि त्यास म्हणाला, ''हे बघा वली राम! तुम्ही माझ्या दरबारातील सर्वोत्तम बुद्धीमान प्रधानमंत्री आहात. मी तुमचा खूप आदर करतो आणि तुमच्यावर प्रेमही करतो. तुम्ही माझ्यासोबत परतणार नाही का?'' वली राम म्हणाला, ''नाही! आता मी दुसऱ्या प्रकारच्या सेवेत

गुंतलो आहे. ही सेवा तुमच्या सेवेपेक्षा श्रेष्ठ आहे.'' राजा म्हणाला, ''वली राम! तू जे मागशील, ते मी तुला देऊ शकतो.'' तेव्हा वली राम म्हणाला, ''माझी इच्छा आहे की तुम्ही येथून निघून जावे.''

या इच्छाच आपणांस बाह्य वस्तूंच्या बंधनामध्ये गुंतवितात. आपण प्रधानमंत्री बनू शकतो, बादशाह बनू शकतो, हवे ते पद प्राप्त करू शकतो. मनुष्यास जे हवे ते तो प्राप्त करून घेतो व त्यासाठी आपणांस वाईट–चांगले सर्वप्रकारच्या मार्गांचा अवलंब करावा लागतो. सतगुरु सांगतात की जोपर्यंत तुम्ही इच्छा रहित बनत नाही, तोपर्यंत तुम्ही तुमचे शरीर आणि बाह्य वस्तूंचा मोह त्यागू शकत नाही. इच्छांचा त्याग करा. त्याच तुम्हांस बाह्य वस्तूंच्या मोहात अडकवतात. जर तुमच्या अंतरात परमात्मा प्राप्तीची इच्छा असेल व तुम्ही परमात्म्याचे बनलात तर तुम्ही चिंतामुक्त व्हाल.

तुम्हांस कल्पना आहे का की काय होत आहे? रात्रं–दिवस आपल्या श्वासांची पुंजी कमी होत आहे. आपले उर्वरीत आयुष्य मोजक्याच दिवसांचे आहे. पूर्व देशातील गुरु सांगतात की, तुमचे उर्वरीत श्वास मोजकेच असून ते एके दिवशी नक्कीच संपणार आहेत. श्वास शरीरात जातो, बाहेर पडतो, परंतु अजून आपण बाह्यजगातील विचारांमध्ये बुडालेलो आहोत. आपणांस त्याविषयी जरासुद्धा काळजी वाटत नाही. आपण अगदी बेफिकीर आहोत.

आयुष्याचा अवधी निघून चाललेला आहे. वेळ कोणाचीही वाट पाहत नाही. हे एका अशा पाण्याने भरलेल्या घड्याप्रमाणे आहे ज्यातून थेंब थेंब पाणी गळत आहे. अखेरीस एके दिवशी तो घडा रिकामा होईल, त्यामधील सर्व पाणी बाहेर वाहून जाईल. त्या पाण्याच्या थेंबांप्रमाणे आपले श्वास एक–एक करीत बाहेर पडत आहेत.

आपण विचार करतो की आपण वृद्ध होत आहोत परंतु सत्य हे आहे की आपण दिवसेंदिवस लहान होत आहोत. एका मनुष्याचे जर पन्नास वर्षे आयुष्य असेल व त्याने दहा वर्षे व्यतीत केली असतील तर त्याची चाळीस वर्षे

उरतात, वीस वर्षे व्यतीत केली असल्यास केवळ तीसच वर्षे उरतात. मग अशावेळी तुम्ही मोठे होत आहात की लहान?

सर्वप्रथम मनुष्याने आपल्या जीवनाचे ध्येय नक्की करावयास हवे. आपले ध्येय काय आहे हे सर्वात महत्त्वाचे आहे. परमात्म्याचे ज्ञान हे मनुष्यासाठी सर्वश्रेष्ठ ध्येय आहे. आयुष्याचा अवधी कमी-कमी होत आहे. मला वाटते की, तुम्ही येथे बसलेल्या लोकांपैकी कोणी वीस, तीस, चाळीस, पन्नास वा साठ वर्षांचे आहात. तुम्ही तुमचे ध्येय प्राप्त केले आहे काय? परमात्म्याची प्राप्ती हे ते ध्येय आहे.

देखावा करून कार्यसिद्धी होणार नाही. तुम्ही स्वत:ची फसवणूक करीत आहात व तुमच्या अंतरात बसलेल्या परमात्म्याची देखील फसवणूक करण्याचा प्रयत्न करीत आहात. काय तुम्ही परमात्म्यापाशी पोहोचला आहात? काय तुम्ही परमात्म्यास पाहिले आहे? काय तुम्ही परमात्म्याप्रती एकनिष्ठ आहात? जर असे असेल तर ही खूप मोठी गोष्ट आहे. परंतु तसे नसल्यास मात्र आपणांस घाई करणे गरजेचे आहे. जो काही थोडा-फार वेळ आपल्याकडे उरलेला आहे, त्यापैकी जास्तीत जास्त वेळ यासाठी वापरावयास हवा, जेणेकरून शरीर सोडण्यापूर्वी आपली पूर्ण तयारी व्हावयास हवी. आपली वेळ भरल्यानंतर आपणांस हे शरीर सोडावे लागेल, श्वासांची पुंजी संपलेली असेल, त्यावेळी काय बरे होऊ शकते?

या खूप साधारण स्थराच्या गोष्टी वाटतात, परंतु हे कटू सत्य आहे. स्वत:चे तपासणीस तुम्ही स्वत:च आहात. तुम्ही स्वत:शी सच्चे व प्रामाणिक आहात काय? तुम्ही परमात्म्याशी जोडले गेलेले आहात काय? तुमच्या भल्यासाठी तुम्हांस नामदान दिले गेले आहे, ही परमात्म्याची कृपा आहे. तुम्हांस जे काही थोडे-फार दिले गेले आहे, त्यात आणखी वृद्धी करा.

क्राईस्ट एके ठिकाणी सांगतात, ''एका श्रीमंत मनुष्याने एका मनुष्यास पाच रुपये, दुसऱ्यास दोन रुपये आणि तिसऱ्यास एक रुपया दिला. काही

काळाने त्या श्रीमंताने ज्या मनुष्यास पाच रुपये दिले होते, त्यास विचारले की तू त्या रुपयांचे काय केलेस? त्या मनुष्याने उत्तर दिले, मी पाचाचे दहा रुपये केले आहेत. ज्यास दोन रुपये दिले होते, त्यास विचारले तू काय केलेस? त्याने उत्तर दिले मी दोनाचे चार रुपये केले आहेत. ज्याला एक रुपया दिला होता, त्यास विचारले असता, त्याने उत्तर दिले की मी तो रुपया तसाच सांभाळून ठेवला आहे. त्यावर त्या श्रीमंताने त्याच्याकडून तो रुपया परत घेतला.''

तुम्ही माझ्या सांगण्याचा अर्थ समजून घ्या की मी काय सांगू इच्छितो! तुम्ही तुमची बुद्धी एका बाजूस ठेवा. पाहा! आपल्यासमोर येणाऱ्या गोष्टी कटू आहेत. हा एका हृदयाचा दुसऱ्या हृदयाशी होत असलेला संवाद आहे. मी ज्या गोष्टी तुमच्यासमोर मांडत आहे, काय तुम्ही त्यादृष्टीने पाहात नाही का? प्रत्येक दिवस, प्रत्येक तास, प्रत्येक मिनिट, प्रत्येक सेकंद तुम्हाला मृत्यूच्या समिप आणत आहे.

आपला बराच वेळ वाया गेला असून अजूनही आपण आपले ध्येय साध्य केलेले नाही, ज्याचा परिणाम असा होईल की आपण बाह्य–बंधनांमध्ये अडकून पडू आणि आपणांस पुन्हा येथे यावे लागेल. याला कारणीभूत आपल्या इच्छा आहेत, ज्या आपणांस पुन्हा माघारी आणतील. परमात्म्याच्या प्राप्तीची आपली इच्छा, आपणांस परमात्म्याजवळ घेऊन जाईल. असा नियम आहे की अंत समयी आपली जी तीव्र इच्छा असेल, तेथे आपली रवानगी केली जाईल.

मी आपणांस खूप मोठे प्रवचन देत नसून फक्त साध्या–सरळ शब्दांमध्ये समजावून सांगत आहे. मी अशी कोणतीही गोष्ट तुम्हांस सांगत नाही आहे जी तुम्हाला समजणार नाही. ही अतिशय दु:खद गोष्ट आहे की आपण स्वत:ची फसवणूक करीत आहोत. परमात्मा आपल्या जवळ का येत नाही? तर आपण त्याची फसवणूक करीत आहोत.

सत्य जाणून घेण्यासाठी दोन जिज्ञासू एका संतांकडे गेले. दोघांपैकी कोण लायक आहे हे समजून घेण्यासाठी संतांनी त्यांची परीक्षा घेतली. संतांनी दोघांच्याही हातात एक-एक कबूतर देत म्हणाले,''याची तुम्ही अशा ठिकाणी हत्या करा ज्याठिकाणी कोणी पाहत नसेल.'' एक जिज्ञासू अतिशय चतुर व चालाख होता. तो कबूतर घेऊन भिंतीआड गेला व कबुतरास ठार करून थोड्याच वेळात परतला. दुसरा बिचारा सकाळपासून संध्याकाळपर्यंत भटकत राहिला, परंतु त्यास असे एकही ठिकाण सापडले नाही जेथे त्यास कोणी पाहत नसेल. संध्याकाळी परत येऊन तो संतांना म्हणाला, ''महाराज! मला असे कोणतेही ठिकाण सापडले नाही, ज्या ठिकाणी मी या कबूतराची हत्या करू शकलो असतो, कारण प्रत्येक ठिकाणी हे कबूतर मला व मी कबूतरास पाहत होतो.'' तोच जिज्ञासू ज्ञानार्जनासाठी लायक ठरला.

ही अतिशय साधारण गोष्ट आहे की तुम्ही एम.ए. पास आहात, तुम्ही भले पी.एच.डी. केली आहे, तुम्ही कोणी मोठे राजे वा महाराजे आहात. परंतु हे अगदी नगण्य आहे. तुम्हांस हे शरीर त्यागावे लागेल व तेथे जावे लागेल जेथे तुम्ही जोडले गेलेले आहात. वेळोवेळी सतगुरु आपणांस शरीरबंधनातून बाहेर काढण्यासाठी येतात. हा त्यांचा 'क, ख, ग' असा पहिला धडा आहे.

तुम्ही जितके बाहेर गुंतलेले असाल तेवढे वर जाणे तुमच्यासाठी अवघड असते. तुम्ही किती प्रगती केलीत, स्वत:च्या उद्धारासाठी किती वेळ दिलात आणि तुम्ही कोणत्या गोष्टींच्या बंधनात गुंतलेला आहात याची तुम्हास जाणीव व्हावी यासाठीच तुम्हाला डायरी दिली जाते. या गोष्टींना एक-एक करीत तुम्ही सोडून द्या. तुम्ही तुमचा कितीतरी वेळ वाया घालवीत आहात. सर्वच सतगुरु असे सांगतात की क्षणोक्षणी परमात्मा तुम्हास अंतर्यातून आवाज देत आहे. तुमच्या अंतर्यात वरून तो शब्द गुंजत आहे.

तुलसी साहेब सांगतात, ''गगनातून शब्द-ध्वनी गुंजत आहे, जो मला माघारी बोलावित आहे.'' शम्स तबरेज सांगतात,''मी या शरीररूपी मंदिरात

ध्वनी ऐकत आहे. तो आवाज मला माघारी बोलावित आहे की ये, घंटा जोर–जोराने वाजत आहे.'' आपण हा आवाज ऐकत नाही. तुम्हांस ज्योतीचे दर्शन दिले जाते, ज्यायोगे तुमच्या लक्षात यावे की तुम्हांस कोणत्या मार्गाने जायचे आहे आणि आवाज परमात्म्याकडे जाण्याच्या मार्गाची दिशा दर्शवितो. परमात्म्याकडे जाण्याचे हेच दोन मार्ग आहेत.

सतगुरु नेहमीच सांगतात की हे सर्व काय आहे? असे का होत असते? हे सर्व आपल्या इच्छांमुळेच होत असते. आपणांस स्वत:चा विसर पडला आहे. मनुष्य शरीरापासून या चुकीची सुरूवात होते आणि आपणदेखील या शरीरामुळेच ओळखले जातो. हे शरीर तसेच हे जगही बदलत आहे.

आपण मोठ्या भ्रमामध्ये अडकलो आहोत. या इच्छा आपणांस बाह्यजगात गुंतवून ठेवतात. जेव्हा आपण शरीर सोडतो तेव्हा आपल्या अंतरामध्ये या बाह्यजगातील इच्छा असतात. परंतु परमात्मा प्राप्तीची इच्छा या बाह्य जगातील इच्छेंपेक्षा खूप श्रेष्ठ आहे.

सतगुरुंनी अतिशय सरळ–सोप्या शब्दांमध्ये उपदेश दिले आहेत, ज्यांना एक लहान मुलही सहजतेने समजू शकते तर मग विद्वान लोकांना फारच सोपे आहे. परंतु विद्वान लोक बौद्धिक कुस्ती करता–करता या गोष्टींना विसरून जातात. सतगुरु तुमच्यावर खूप प्रेम करतात. परमात्मा सतगुरुंच्या अंतर्यात असून तुम्ही परमात्म्याची मुले आहात. तुम्हांस स्वत:कडे आणण्यासाठी परमात्मा वेळोवेळी सतगुरुंना या जगामध्ये पाठवितात.

महत्त्वाची बाब ही आहे की या कामामध्ये तुम्हाला कोण मदत करू शकतो? ते म्हणजे एखादे गुरु जे पूर्ण महापुरुष असतात व जे या जगामधील चैतन्या पलीकडे गेलेले असतात, जे स्वत:च्या इच्छेपार गेलेले असतात, जे या जगात कार्य करीत असतानाही बंधनमुक्त असतात. होडी पाण्यात असते परंतु होडीत पाणी नसते. ते नेहमी आपणांस सांगत असतात,''पहा! परमात्मा तुमच्या अंतर्यातच असून तो आपणांस माघारी बोलावत आहे.''

तुम्हांस ती वस्तू प्राप्त झालेली आहे परंतु अद्याप तुम्ही अज्ञानी आहात. तुम्ही बाह्यजगाच्या बंधनात आणि भ्रमात गुंतून पडला आहात. तुम्हांस असे सतगुरु लाभले आहेत, ज्यांना परमात्म्याने याच कार्यासाठी या जगात पाठविलेले आहे. सतगुरु तुमच्यावर प्रेम करतात, कारण तुम्ही परमात्म्याची मुले आहात. ते तुमच्यावर कृपा करतात आणि तुमच्या सर्व कामांची देखभालही करतात.

आपण जेव्हा सतगुरुंच्या चरणी जातो, तेव्हा त्यांना आपली देखभाल करावीच लागते. ते आपल्या पूर्व जन्मांमधील कर्मांना नष्ट करतात आणि आपणांस आपल्या स्वगृही घेऊन जातात. परंतु त्यासाठी महत्त्वाचे आहे की आपण त्यांच्या आदेशांचे पालन करावयास हवे. अनेकदा आपण त्यांच्या आदेशांचे पालन करीत नाही, स्वत:ची फसवणूक करतो व आपल्या अंतर्यात असलेल्या परमात्म्याचीही आपण फसवणूक करतो. मी तुम्हांस निवेदन करतो की तुम्ही सच्चे व प्रामाणिक बना.

अखेरीस एके दिवशी तुम्हांस या बाह्य जगातील सर्व वस्तू, सर्व संबंध आणि धन–संपत्ती सोडावी लागणार आहे. तुम्ही जर आत्तापासूनच हळू–हळू यांचा त्याग करण्याची सुरूवात कराल तर त्या देखील तुम्हांस सोडून देतील. आपण जेव्हा या बाह्यजगातील वस्तूंमध्ये गुंतलेलो असतो, तेव्हा आपणांस आनंद प्रतीत होत असतो. त्यामुळे जेव्हा या गोष्टी आपणांपासून दुरावतात तेव्हा आपणांस दु:ख वाटते. सतगुरु आपणांस परमात्म्याच्या शक्तीशी जोडण्यासाठी येतात.

सतगुरु आपणांस सदास्वरूपी निरंतर शांती आणि आनंद देऊ इच्छितात. तुम्ही जेथे रहात आहात, तेथेच रहा. तुम्ही शरीरावर जे जाती–धर्माचे लेबल लावले आहे, त्यामुळे अध्यात्मावर काहीच फरक पडत नाही. आपला कोणताही धर्म वा कोणतेही गुरु असोत, जो नियम आपल्यासाठी बनला आहे, त्यावरच आपणांस चालणे आवश्यक असते.



एखाद्या गुरुंच्या चरणी जाणे म्हणजे आपल्यावर खूप कृपा झालेली असते. जे लोक परमात्मा मिलनासाठी तळमळत असतात, सतगुरु त्यांची भेट परमात्म्याशी करून देतात. ज्यांच्या अंतरात परमात्मा भेटीची जेवढी अधिक भूक असते, तेवढ्या लवकर ते परमात्म्यास प्राप्त करतात. परमात्म्याच्या प्राप्तीची इच्छा तुम्हांस त्याच्या समिप आणेल. तुम्ही परमात्म्यासाठी एक पाऊल उचललेत, तर तो तुमच्यासाठी शेकडो पावले पुढे येतो. मात्र तुम्ही जगाची इच्छा ठेवलीत तर तुम्ही खालच्या दिशेने जाल; एवढीच गोष्ट आहे.

तुमच्या समोर मी जे काही प्रवचन मांडले, त्याचा तुम्ही शांतचित्ताने विचार करा. जर तुमच्या अंतरात परमात्म्याच्या प्राप्तीसाठी उत्कंठा असल्यास इतर सर्व गोष्टी एका बाजूस राहतील. हे शरीर सोडल्यावर तुम्ही खात्रीने परमात्म्याकडेच जाल. तुम्ही आत्तापासूनच परमात्म्याच्या सान्निध्यात जाल. कुराणामध्ये परमात्मा म्हणतो,''जे माझी आठवण काढतात, मी त्यांस आठवण करतो.'' जेवढ्या आपुलकीने आपण जगाकडे पाहतो, तेवढ्या आपुलकीने आपण स्वत:कडे पाहत नाही. जोपर्यंत आपण स्वत:च्या अंतरामध्ये डोकावून पाहत नाही, तोपर्यंत आपणांस कशी कल्पना येईल की आपल्या नशीबात काय लिहिले आहे? आपण नेहमी इतरांकडे बाह्यस्वरूपातच पाहतो.

आत्तापासूनच तुम्ही परमात्म्याच्या मधुर आठवणीत रहा, त्या मधुर आठवणी सातत्याने तीन दिवस करीत रहा. रामाकृष्ण सांगतात,''जो मनुष्य सतत तीन दिवस परमात्म्याची आठवण करेल, तो परमात्म्याचे दर्शन करेल.'' या जोशात सातत्याने तीन दिवस परमात्म्याच्या सुमधुर आठवणींमध्ये दंग रहा. बस! एवढेच.

***

रोजनिशी

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे कार्यक्रमा अखेरीस संगतला दिलेला संदेश
बेंगलोर, कर्नाटका – १२ जुलै १९८७

सर्व महात्म्यांनी सत्संगाच्या महिमेचे वर्णन केले आहे. आपले भाग्य उत्तम असेल तरच आपणांस सत्संग लाभतो. सत्संगाद्वारेच आपल्या अंतरात वैराग्य, विरह आणि तळमळ निर्माण होते. सत्संगामध्ये जे काही आपण ऐकतो, त्यावर अंमल करणे आपले कर्तव्य आहे. ठराविक प्रकारची थोडी फार पापं असतात. साधारणत: काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांच्यामुळेच आपण पापं–दुष्कर्मं करतो.

संत–महात्मा या पाच डाकुंबद्दल आपणांस प्रेमाने समजावतात की हे डाकू आपल्या नामाची शिदोरी कसे लुटत आहेत! आपण जर एक सत्संग ऐकल्यावर एक अवगुण त्यागल्यास काही सत्संग ऐकून आपण सर्व अवगुण त्यागण्यात यशस्वी होऊ शकतो. स्वामीजी महाराज सांगतात:

सतसंग करत बहुत दिन बीते, अब तो छोड़ पुरानी बात।

सत्संग ऐकत ऐकत आपले सर्व आयुष्य संपून जाते. सत्संगास गेलो, परत आलो, गेलो, परत आलो असा केवळ रिती–रिवाज करता कामा नये. सतगुरु महाराजांनी आपणांस डायरी (रोजनिशी) लिहिण्यासाठी दिली. ही **रोजनिशी** आपल्या जीवनाचा सुधार करण्याचे सर्वोत्तम आणि सुंदर साधन आहे. सर्व संतांनी आपआपल्या पद्धतीने आपणांस पाप–दुष्कर्मं करण्यापासून रोकले आहे. आपण आपल्या अंतरामधील सर्व वाईट विचारांना झाडून बाहेर फेकून दिले तरच आपण परमात्म्यास भेटण्यास लायक बनू शकतो.

गुरु गोविंद सिंहजी रोपड या विभागात गेले. त्यांना तेथे अनेकजण भेटले. गुरु गोविंद सिंह महाराजांनी त्यांना विचारले,''तुम्ही काय कामधंदा करता?'' ते म्हणाले,''आम्ही चोरी करतो, दरोडे घालतो.''

गुरु गोविंद सिहंजी महाराज त्यांस म्हणाले,''प्रियजनहो! तुम्ही तुमच्या या कर्मांचा हिशोब कसा चुकता कराल? कारण मृत्युपश्चात तुमच्या कर्मांचा हिशोब घेणारा देखील कोणीतरी आहे.'' यावर ती माणसे म्हणाली, ''आजपर्यंत आम्हांस कोणीच सांगितले नाही की आमच्याकडून कोणी कर्मांचा हिशोब घेणार आहे.'' आम्हांस तर असे वाटत होते की:

ऐह जग मिट्ठा अगला किन डिट्ठा।

तुम्ही परोपकारी महात्मा आहात. आता तुम्हीच एखादा उपाय सांगा, ज्यामुळे आमचा त्यापासून बचाव होईल. त्याकाळी लोक इतके शिकले-सवरलेले नव्हते. गुरु गोविंद सिंहजींनी त्यांना सांगितले की जेव्हा तुमच्या हातून एखादे पाप होईल, तेव्हा तुम्ही एक दगड उचलून एका ठराविक ठिकाणी ठेवा. पुन्हा दुसरे पाप झाल्यावर आणखीन एक दगड त्याच ठिकाणी ठेवा. संध्याकाळी झोपण्यापूर्वी तुम्ही पहा की किती दगड जमा झाले आहेत? मग विचार करा की तुमच्या हातून किती पापं झाली आहेत? त्या गावातील सर्व लोकांनी याप्रमाणे केले असता, संध्याकाळी दगडांचे मोठ-मोठे ढिग तयार झाले. ते पाहून सर्वांनी एकत्र बसून विचार केला की, आपण तर यापूर्वी एकत्रही येत नव्हतो. महात्म्यांच्या संगतीमुळे आपणांस एकत्र बसण्याची संधी मिळाली, जसे आज आपण सर्व येथे एकत्र बसलो आहोत.

अशाच तऱ्हेने सर्वांनी एकत्र बसून एकमेकांना विचारले की, तुझे किती दगड जमा झाले, तुझे किती झाले? त्यांनी आप-आपले जमा झालेले दगड एक-मेकांना दाखविले. त्यांनी विचार केला की आपण या कर्मांच्या हिशोबाची परतफेड कशी बरे करू शकू? अखेरीस सर्व गावकऱ्यांनी एकत्र बसून विचार केला की ना आपण पापं करावी, ना आपणांस त्यांचा हिशोब द्यावा लागेल. जेव्हा पुन्हा गुरु गोविंद सिंहजी त्या विभागात गेले, तेव्हा ते त्यांना पहिल्यापेक्षाही अधिक प्रेम व आदरभावाने भेटले व त्यांनी गुरु गोविंद सिंहजींची खूप कदर केली की या महान महात्मांनी आपली अवगुण-पापांपासून सुटका केली, आपणांस परमात्म्याच्या देशेला वळविले आहे.

गुरु साहेबांनी त्यांना विचारले, ''तुमची काय परिस्थिती आहे?'' ते म्हणाले की आता आमचे संसारिक कामकाजही ठिक आहेत आणि आम्ही परमेश्वराची भक्तीदेखील दररोज करीत आहोत. आमच्या मनास अधिकाधिक शांती लाभली आहे. आम्ही एकच दिवस तुम्ही सांगितल्याप्रमाणे दगड एकत्र केले असता, मोठ–मोठे दगडांचे ढिग तयार झाले होते. त्यामुळे आम्ही निर्णय घेतला की ना आपण पापं करावी, ना कर्मांचा हिशोब आपणांस द्यावा लागावा. आम्हांस तुमच्या नामाची, उपदेशाची आणि कृपेची गरज आहे. आता तुम्ही विचार करा; जर त्या गावास महात्मा भेटले नसते तर त्यांचा उद्धार कसा बरे झाला असता?

याचप्रमाणे महाराज कृपालजींनी आपणांस **रोजनिशी** लिहिण्याचा सल्ला दिला की आपण दिवसभरामध्ये जे काही पाप–अवगुण केले, कोणाची निंदा–चुगली केली, कोणाची आपल्या पैशांनी मदत वा नुकसान केले आणि संपूर्ण दिवसात किती ध्यान–अभ्यास केला. त्यामुळे सत्संगीस यागोष्टींचे आकलन होते व स्वत:चा सुधार करण्याची छान संधी मिळते. अमेरिकेमध्ये जेव्हा अनेक प्रेमींनी मला प्रश्न विचारले की महाराज कृपालजींनी दिलेल्या रोजनिशीबद्दल आपण अधिक माहिती द्यावी, तेव्हा मी म्हणालो:

सौ स्याणयां इको मत, मुर्खा आपो आपणी।

सर्व समजूतदार लोकांचे एकच मत असते. मी अनेक प्रेमींनी लिहिलेल्या **रोजनिशी** पाहतो. ते साधारणत: त्याच–त्याच चुका दररोज करीत असतात. प्रियजनहो! आपण जेव्हा एखादी चूकी मान्य करून तिची नोंद रोजनिशीमध्ये करतो, तेव्हा ती चूक पुन्हा दुसऱ्यावेळी का बरे करावी? आपण स्वत:मध्ये सुधार केला तरच **रोजनिशी** लिहिण्याचा काही उपयोग आहे. आज एखादे पाप आपल्या हातून घडल्यास त्याची नोंद रोजनिशीमध्ये झाली. मग तेच पाप आपल्या हातून पुन्हा का व्हावे? परंतु **रोजनिशी** लिहिण्याची आपण एक प्रथाच करून टाकली आहे.

आज भंडाऱ्याचा अखेरचा दिवस आहे. सतगुरुंच्या कृपेने आपणांस अनेक दिवसांच्या सत्संगाचा लाभ झाला. जे काही आपण सत्संगामध्ये ऐकले आहे, त्यावर अंमल करणे आपले कर्तव्य आहे.

बाबा सोमनाथजींनी जीवनात खूप संघर्ष केला. त्यांनी खूप तपश्चर्या व साधना केली होती. साधना करीत असताना त्यांच्या नशिबात महाराज सावन सिंहजींशी भेट होण्याचा संयोग लिहीलेला होता, त्याप्रमाणेच झाले. महाराज सावन सिंहजींच्या भेटीनंतर त्यांच्या जीवनात परिवर्तन झाले. जे आपण अगोदर करीत होतात ते आपण थांबविले. स्वामीजी महाराज सांगतात:

जब जीव शरण गुरु की आवे, कर्म धर्म सब भ्रम नसावे।
जो मार्ग गुरु दे बताई, सोई कर्म धर्म हुआ भाई।।

आपण जेव्हा सतगुरुंना शरण येतो, अगोदर करीत असलेले रितरिवाज करण्याचे थांबवितो आणि सतगुरुंनी दर्शविलेल्या मार्गाचा अंगिकार करतो, तेव्हा आपण आपल्या आयुष्यात यशस्वी होतो.

महाराज सावन सिंहजींमुळे माझी बाबा सोमनाथजींशी छोटीशी भेट झाली. परमात्म्याच्या शोधात बाबा सोमनाथजींप्रमाणेच मी देखील खूप धूनीतप तसेच जलधारा वगैरे केले, परमात्म्याच्या शोधात अनेक ठिकाणी फिरलो. पेशावर येथे जेव्हा महाराज सावन सिंहजींचे मला दर्शन झाले तेव्हा बाबा बिशनदासजींना मी महाराज सावन सिंहजींबद्दल माहिती दिली. बाबा बिशनदासजींद्वारे मला दोन शब्दांचे नाम प्राप्त झाले होते.

बाबा बिशनदासजी विहिरीतील बेडकाप्रमाणे संकुचित विचारांचे नव्हते. आपणांस विहिरीतील बेडकाची गोष्ट माहित आहेच. समुद्रात वावरणारा एक हंस विहिरीत राहणाऱ्या एका बेडकाकडे गेला. बेडकाने विचारले, तू कोण आहेस? त्याने उत्तर दिले, मी समुद्रात राहणारा एक गरीब हंस आहे. बेडकाने हंसाला विचारले की समुद्र किती मोठा आहे? हंस म्हणाला, समुद्र खूप मोठा आहे. बेडकाने विहिरीमध्ये लहानशी फेरी मारून हंसास विचारले की

समुद्र विहिरीच्या या भागापेक्षा मोठा आहे का? हंस म्हणाला, होय! यापेक्षा मोठा आहे. पुन्हा बेडकाने एक मोठी फेरी मारून विचारले, यापेक्षाही मोठा आहे का? हंस म्हणाला, होय! यापेक्षाही समुद्र मोठा आहे. अखेरीस विहिरीच्या पलिकडच्या तीरावर जाऊन बेडूक उभा राहिला व त्याने हंसाला विचारले, यापेक्षाही समुद्र मोठा आहे का? हंस म्हणाला, हो! याहूनही समुद्र मोठा आहे. तेव्हा बेडूक म्हणाला, तू बेईमान आहेस तू खोटे बोलतोस. समुद्र यापेक्षा मोठा असूच शकत नाही. हंस प्रेमाने बेडकास म्हणाला, तू माझ्यासोबत येऊन पहा! तुझ्या विहिरीपेक्षा समुद्र खूपच मोठा आहे. परंतु बेडूक विहिरातून ना बाहेर पडला, ना त्याने समुद्र पाहिला, ना तो हंसाचे सांगणे मान्य करी.

आपली देखील अशीच अवस्था आहे. आपण ना समाजाच्या बंधानातून बाहेर येतो ना कर्मकांडांचा त्याग करतो. संतांबरोबर जाऊन आपण आपल्या खऱ्या घरास, सच्चखण्डास पाहतही नाही. संत–महात्मा आपणांस अंध–विश्वास देत नाहीत. ते आपणांस प्रेमाने सांगतात की तुम्ही स्वत: अंतर्यात येऊन पहा आणि मगच विश्वास ठेवा. परंतु आपण त्यास राजी होत नाही, कारण आपले घर पहायची इच्छा आपल्या अंतरात निर्माण झालेली नसते.

मी ज्यावेळी बाबा बिशनदासजींना महाराज सावनजींकडे घेऊन गेलो, त्यावेळी बाबा बिशनदासजींसोबत एक मुसलमान फकीर फत्ती देखील होता. बाबा बिशनदासजी आणि फत्ती फकीर यांची आपआपसांमध्ये खूप सलगी होती. दोघांचेही आश्रम जवळ–जवळ होते.

बाबा बिशनदासींनी महाराज सावन सिंहजींकडे गेल्यावर माझ्याबद्दल प्रशंसेचे काही शब्द उच्चारले. ते म्हणाले,''हा माझा एकुलता एक शिष्य असून मी इतर कोणालाही हा मार्ग सांगितला नाही. खूप कर्मकांडे केल्यावर हा माझ्याकडे आला होता. मी माझ्या समजूतीनुसार यास म्हटले होते की माझ्याकडे एवढेच ज्ञान असून तुला जर याच्यावरचे ज्ञानार्जन झाले तर तू मला नक्की सांग. मी माझ्या या शिष्यामुळेच तुमच्या चरणांशी आलो आहे.''

त्यावेळी महाराज सावन सिंहजींनी महाराज सोमनाथजींना बोलावून म्हटले की माझादेखील एक शिष्य आहे, ज्याने आयुष्यात परमार्थासाठी खूप संघर्ष केला असून त्याने बाह्य जगातील खूप तप–साधना केली आहे. माझी बाबा सोमनाथजींशी एवढीच भेट झाली होती.

तुम्ही पहा! बाबा सोमनाथजींनी नामाची कमाई केली, महाराज सावन सिंहजींनी जे काही त्यांना सांगितले त्यावर त्यांनी अंमलबजावणी केली. महाराज सावन सिंहजींनी त्यांच्यावर दक्षिण भारतीय आत्म्यांची जबाबदारी सोपविली. ज्या आत्म्यांमध्ये ते प्रेमाचे बी पेरून गेले होते त्या आत्म्यांमुळे आपण सर्वजण येथे एकत्र आलो आहोत. रात्रीच्या सत्संगामध्ये आले होते:

सतगुरु की महिमा सतगुरु जाने, जो कुछ करे सो आपण भाणें।।

सतगुरू स्वत:चा महिमा स्वत:च जाणतात. ते जे काही करतात त्याबद्दलचे ज्ञान केवळ त्यांनाच असते. कोणत्या जीवास कोणती जबाबदारी द्यावी, कोणाकडून कोणते काम करवून घ्यावे, हे त्यांचे त्यांनाच माहित असते.

बाबा सावन सिंहजी महाराजजींनी डलहौसी येथे पहाडावर जाऊन नामदान केले. ज्यांना नामदान दिले, त्यांना खूप चांगले आंतरिक अनुभव झाले, अनेकांची सुरत अंतर्यात गेली. सत्संगामध्ये महाराज सावन सिंहजी नेहमी सांगत की डलहौसी येथील पहाडावर खूप चांगले आत्मा आहेत.याचप्रमाणे मी येथे शंभराहून अधिक लोकांना नामदान दिले. येथे देखील डलहौसीप्रमाणेच

खूप चांगले आत्मे आहेत. माझे हृदय खूप प्रसन्न झाले असून अनेकांना खूप चांगले अनुभव आले आहेत. या तहानलेल्या आत्म्यांना कल्पना नाही की त्यांनी कित्येक जन्मापासून सत्कर्मे केली आहेत.

एखाद्या आत्म्याच्या प्रेमाबद्दल आपणांस तेव्हा कल्पना येते, जेव्हा तो आत्मा महात्म्यांच्या संपर्कात येतो. याचप्रमाणे सोन्याच्या खरेपणाची कल्पना तेव्हाच येते, जेव्हा ते पारसाच्या कसोटीवर पारखले जाते. आपण जे काही सत्संगामध्ये ऐकले आहे, त्यावर सर्वांनी प्रेम–भावनेने अंमल करावयास हवा. सत्संगामध्ये यापुढेही हजेरी लावावी, कारण सत्संगामुळेच आपले जीवन सफल बनते. सत्संगाशिवाय आपल्या अंतरामध्ये रुक्षपणा निर्माण होतो.

येथील प्रेमींनी, पश्चिमी प्रेमींनी तसेच मुंबई येथील प्रेमींनी देखील सेवा करण्यामध्ये मोठ्या हिरहिरीने सहभाग घेतला, जर सेवादारांकडून एखादी चूक झाली असेल वा त्यांच्याद्वारे कोणासही कडक शब्द बोलले गेले असतील तर आम्ही त्यांच्यातर्फे तुमची माफी मागतो. अमुक सेवादार मला असे म्हणाला असा अभाव घेऊन कोणत्याही प्रेमीने घरी जाऊ नये.

मी आशा करतो की ज्यांनी सेवा केली आहे, त्यांची सेवा, आपले गुरूदेव परमपिता कृपाल, बाबा सावन सिंहजी महाराज सत्कारणी लावतील. महाराज सावन सिंहजी महाराज सांगत असत, ''सेवा नगद सौदा आहे. सेवा केल्याने आपले तन, मन आणि धन सर्वकाही पवित्र बनते.'' आज भंडाऱ्याचा अखेरचा दिवस आहे. मी आशा करतो की सर्व प्रेमी घरी परतल्यानंतरही जास्तीत जास्त नामाचा जप करतील आप–आपसांमध्ये प्रेम आणि बंधुभाव कायम ठेवतील.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणितील
संत बानी आश्रम, राजस्थान येथील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने संत बानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथे त्यांच्या मधुर आठवणीत सत्संगाचे कार्यक्रम निम्नलिखीत दिवशी आयोजित केले जात आहेत. तेव्हा सर्व बंधू–भगिनींनी महाराजजींच्या कार्यक्रमात सहभागी होऊन आश्रमातील शांत वातावरणात नामस्मरणाचा व संतवचनांचा लाभ घ्यावा.कार्यक्रमात जाण्याचा उद्देश लक्षात ठेऊन तेथील वेळापत्रकाचे पालन करावे ही नम्र विनंती.

४ मार्च २०१६ ते ६ मार्च २०१६

३१ मार्च २०१६ ते २ एप्रिल २०१६

***